# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः02.03.2025** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या**

1) कृषी क्षेत्राला आणखी लवचिक आणि समृद्ध करणं हा यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पाचा उद्देश असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन

2)पंतप्रधान आजपासून तीन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर, विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार

3) दिल्लीत 31 मार्चनंतर 15 वर्षांपेक्षा जुन्या वाहनांना पेट्रोल-डिझेल मिळणार नसल्याचा दिल्ली सरकारचा निर्णय

4) देशभरात रमजानच्या पवित्र महिन्याला आजपासून सुरूवात

आणि

5) भारत आणि न्यूझीलंड यांच्यात आज चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेतील शेवटचा साखळी सामना.

**कृषि पंतप्रधान**

कृषी क्षेत्राला आणखी लवचिक आणि समृद्ध करणं हा यंदाच्या, केंद्रीय अर्थसंकल्पाचा उद्देश असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. ते काल कृषी आणि ग्रामीण समृद्धी या विषयावरच्या अर्थसंकल्पोत्तर वेबिनारमध्ये बोलत होते. कृषिक्षेत्राला देशाच्या विकासाचं पहिलं इंजिन मानून सरकारनं शेतकऱ्यांना मानाचं स्थान दिलं आहे, असं त्यांनी यावेळी सांगितलं. कृषी क्षेत्राचा विकास आणि खेड्यांची समृद्धी या दोन महत्त्वपूर्ण ध्येयांच्या दिशेनं आपण सर्वजण एकत्र वाटचाल करत आहोत, असंही मोदी यांनी स्पष्ट केलं. सर्वात कमी कृषी उत्पादन असलेल्या देशातल्या 100 जिल्ह्यांच्या विकासासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजना सरकारनं जाहीर केल्याचंही त्यांनी नमूद केलं.

**पंतप्रधान दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी तीन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर असून येत्या दोन दिवसांत ते विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार आहेत. पंतप्रधान आज वंतारा या प्राणी बचाव आणि पुनर्वसन केंद्राला तसंच सासन गीर राष्ट्रीय उद्यानाला भेट देतील.

राष्ट्रीय वन्यजीव मंडळाचे पदसिद्ध अध्यक्ष म्हणून पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली बैठक होणार आहे. पंतप्रधान मोदी सोमनाथ मंदिरात पूजा आणि प्रार्थना केल्यानंतर मंदिर व्यवस्थापन करणाऱ्या श्री सोमनाथ ट्रस्टच्या बैठकीचं अध्यक्षपद भूषवतील. पंतप्रधान या ट्रस्टचे अध्यक्ष आहेत.

**धनखड**

नालंदा, तक्षशीला विद्यापीठांसारख्या संपन्न विद्याकेंद्रांची देदीप्यमान परंपरा आपल्याला लाभली आहे. ही परंपरा आपण जपली पाहिजे असं मत उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी व्यक्त केलं आहे. ते काल मुंबईत के.पी.बी हिंदुजा महाविद्यालयाच्या अमृत महोत्सवी कार्यक्रमात बोलत होते. शिक्षण आणि तंत्रज्ञान हे समाज परिवर्तन घडविणारे महत्त्वाचे घटक असून तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ग्रामीण भागाचा कायापालट घडविण्याचे आवाहन धनखड यांनी केले. ‘विकसित भारत’ हे केवळ स्वप्न नसून निश्चित साध्य असल्याचेही उपराष्ट्रपती धनखड यांनी सांगितले.

**उपराष्ट्रपती**

दरम्यान, उपराष्ट्रपती जगदीप धनखड़ आज तेलंगण मध्ये भारतीय तंत्रज्ञान संस्थेच्या विद्यार्थी आणि प्राध्यापकांशी संवाद साधणार आहेत. तर उद्या केरळच्या एक दिवसाच्या दौऱ्यात उपराष्ट्रपती तिरुवनंतपुरममध्ये भारतीय विचारकेंद्रमच्या वतीनं आयोजित चौथ्या पी. परमेश्वरन स्मृती व्याख्यानात सहभागी होतील.

**दिल्ली पेट्रोल**

दिल्लीत 31 मार्चनंतर 15 वर्षांपेक्षा जुन्या वाहनांना पेट्रोल-डिझेल मिळणार नसल्याचा निर्णय दिल्ली सरकारनं घेतला आहे. राजधानीतल्या वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती पर्यावरण मंत्री मनजिंदर सिंग सिरसा यांनी दिली. या संदर्भातल्या बैठकीनंतर ते माध्यमांशी बोलत होते. दिल्लीत 15 वर्षांहून जुन्या वाहनांची ओळख पटविण्यासाठी एक विशेष यंत्रणा तयार केली जाईल. शहरातील मोठ्या हॉटेल्ससह, इतर मोठ्या संकुलांना प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी त्वरित धूर विरोधी यंत्रणा बसवणे बंधनकारक असल्याचं त्यांनी सांगितलं.

**जीएसटी**

गेल्या फेब्रुवारीमध्ये देशाचा एकंदर जी एस टी अर्थात वस्तू आणि सेवा कर संकलन गेल्या वर्षीच्या याच महिन्याच्या तुलनेत 9 पूर्णांक 1 टक्क्यांनी वाढून 1 लाख 84 हजार कोटी रुपये झालं आहे. सलग 12 व्या महिन्यात जीएसटी संकलन 1 लाख 70 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त झाले आहे. केंद्रीय जीएसटीमधून 35204 कोटी रुपये, राज्य जीएसटीमधून 43 हजार 704 कोटी रुपये, एकात्मिक जीएसटीमधून 90 हजार 870 कोटी रुपये आणि भरपाई उपकरातून 13 हजार 868 कोटी रुपये मिळाले आहेत. फेब्रुवारीमध्ये 20889 कोटी रुपयांचा परतावा करण्यात आला.

**रमजान**

देशभरात रमजानच्या पवित्र महिन्याला आजपासून सुरूवात झाली असून महिनाभर सुरू राहणारी तरावीह ही रात्रीची विशेष नमाज अदा करण्यासाठी भाविकांनी काल रात्री मशिदींमध्ये गर्दी केली होती. आखाती देशांमध्ये रमजान महिन्याचा आज दुसरा दिवस आहे. रमजान महिन्याच्या अखेरीस ईद-उल-फित्र साजरी केली जाते.

**आखाती वृत्त पत्र**

संयुक्त अरब अमिरातीतील वृत्तपत्रांनी प्रयागराज मध्ये नुकत्याच संपलेल्या महाकुंभ मेळयाची  प्रशंसा केली आहे. कुंभ मेळयाचं जागतिक आकर्षण, व्यापक आयोजन आणि जगातील सर्वात मोठ्या धार्मिक मेळाव्यात आखाती देशातल्या रहिवाशांचा सहभाग त्यामध्ये अधोरेखित केला आहे. गल्फ न्यूज, खलीज टाइम्स, गल्फ टुडे आणि द नॅशनल सारख्या वृत्तपत्रांनी कार्यक्रमाची सांस्कृतिक समृद्धी, आध्यात्मिक महत्त्व आणि तांत्रिक प्रगती कडे लक्ष वेधलं आहे.
महाकुंभ हा एक अद्वितीय धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम ठरला असल्याचं खलीज टाईम्सनं  म्हटलं आहे. तर गल्फ न्यूजने प्रयागराजला गेलेल्या आखाती देशातील नागरिकांचे त्रिवेणी संगमावरील पवित्र स्नाना संदर्भातले अनुभव प्रकाशित केले आहेत.

**गाझाशस्त्र संधी**

रमजानच्या काळात गाझामध्ये तात्पुरती शस्त्रसंधी करण्याचा प्रस्तावावर  इस्त्राईलने सहमती  दर्शवली आहे. अमेरिकेचे राजदूत स्टीव्ह विटकॉफ यांच्या शस्त्रसंधी वाढवण्याच्या प्रस्तावाला मान्यता दिली असल्याचं पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्या कार्यालयाने आज सकाळी जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.यापूर्वी झालेल्या शस्त्रसंधीचा पहिला टप्पा संपत असताना हा निर्णय घेण्यात आला आहे. हमासने सहमती दर्शविल्यास इस्त्राईल विटकॉफच्या योजनेवर तातडीने वाटाघाटी करेल असं ही नेतन्याहू यांच्या कार्यालयानं म्हटलं आहे.

**ट्रम्प चर्चा**

चर्चेदरम्यान झालेल्या वादावादीसाठी युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची माफी मागायला हवी, असं अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबीयो यांनी म्हटलं आहे. ट्रम्प यांना रशियाला वाटाघाटी करायला राजी करायचं असून रशिया - युक्रेन संघर्ष थांबवायचा आहे, असं रुबीयो म्हणाले.
व्हाईट हाऊस मधे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प, उपराष्ट्राध्यक्ष जे डी व्हॅन्स आणि युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांच्यात काल रात्री झालेल्या चर्चेत शाब्दिक चकमक झाली होती. दरम्यान, वोलोदिमीर झेलेन्स्की उद्या होणाऱ्या युरोपियन सुरक्षा परिषदेसाठी ब्रिटनमधे पोहोचले असून तिथं ते ब्रिटनचे पंतप्रधान केर स्टार्मर आणि इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांच्याशी चर्चा करणार आहेत.

**बोलिव्हीया**

बोलिव्हियामध्ये महामार्गावर दोन प्रवासी बसेसची टक्कर होऊन झालेल्या अपघातात दोन मुलांसह 37 जणांचा मृत्यू झाला आहे. हा अपघात एका अरुंद दुतर्फा रस्त्यावर झाला. एक बस ओरुरो शहराकडे जात असताना दुसरी एक बस विरुद्ध लेनमध्ये वळल्याने हा अपघात झाला असल्याचं स्थानिक पोलिसांनी सांगितलं.

**उत्तराखंड**

उत्तराखंडमध्ये, चमोली जिल्ह्यातील माना गावात हिमस्खलनामुळे झालेल्या बीआरओ शिबिराच्या ठिकाणाहून 51 कामगारांना बर्फाखाली बाहेर काढण्यात आले आहे. मात्र  त्यापैकी चार जणांचा उपचारादरम्यान काल मृत्यू झाला. उर्वरित चार कामगारांसाठी हिमस्खलनस्थळी शोध मोहीम युद्धपातळीवर राबवली जात असल्याचं आपत्ती व्यवस्थापन सचिव विनोद कुमार सुमन यांनी सांगितलं आहे. शुक्रवारी सकाळी माना आणि बद्रीनाथ दरम्यान सीमा रस्ते संघटनेच्या कॅम्पवर हिमस्खलन झाले, ज्यामध्ये 55 कामगार बर्फाखाली दबले गेले होते.

दरम्यान, अलिकडच्या काळात झालेल्या जोरदार हिमस्खलनामुळे, मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी पर्यटकांना पुढील तीन दिवस औली आणि हर्सिलला प्रवास करणे टाळण्याचे आवाहन केले आहे.

**निधन जळुकर**

ज्येष्ठ लेखिका, प्रवासवर्णनकार डॉ. मीना प्रभू यांचं काल पुण्यात निधन झालं. त्या 85 वर्षांच्या होत्या. गेल्या काही दिवसांपासून त्या आजारी होत्या. त्यांची प्रवास वर्णन असलेली पुस्तके प्रसिद्ध आहेत. प्रभू यांनी जगातल्या अनेक देशांमध्ये प्रवास केला होता. प्रवास वर्णनांवरील त्यांचे लेख विविध वृत्तपत्रे, मासिकांमध्ये प्रकाशित झाले होते.“ माझं लंडन “ या त्यांच्या पहिल्या प्रवास वर्णनानंतर, जगातील निरनिराळ्या ठिकाणांची ज्ञान देणारी रंजक माहिती त्यांनी दिली. गोवा इथं झालेल्या महिला साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषवलं होत. तसेच त्यांना दि .बा . मोकाशी पारितोषिक, गो.नी.दांडेकर स्मृती पुरस्कार, न.चिं.केळकर पुरस्कार , महाराष्ट्र साहित्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार आदि पुरस्कारांनी त्यांना गौरवण्यात आलं होतं.

**चॅम्पियन्स ट्रॉफी**

आयसीसी चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत भारत आणि न्यूझीलंड यांच्यातला सामना आज दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट मैदानावर होणार आहे. भारतीय वेळेनुसार दुपारी अडीच वाजता सामना सुरू होईल. दोन्ही संघांनी अ गटातून उपांत्य फेरीत प्रवेश निश्चित केला आहे. आजचा सामना दोन्ही संघांसाठी महत्त्वाचा आहे, कारण या सामन्यातल्या विजेत्या संघाचा सामना मंगळवारी उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियाशी होणार आहे. तर पराभूत होणाऱ्या संघाचा सामना बुधवारी दक्षिण आफ्रिकेशी होईल. दरम्यान, दक्षिण आफ्रिकेनं काल कराची मध्ये झालेल्या सामन्यात इंग्लंडवर सात गडी राखून विजय मिळवत, स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. या विजयामुळे दक्षिण आफ्रिकेनं अंतिम चारमधलं आपलं स्थान निश्चित केलं आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरच राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार**